# प्रेसनोट

दि. १९/०७/२०२४

**सहायक निबंधक सहकारी संस्था, ता. बारामती, जि. पुणे येथील सहकारी अधिकारी यांचेवर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | अनिलकुमार संभाजी महारनवर, वय ४६ वर्ष, पद सहकारी अधिकारी, नेमणुक - सहायक निबंधक सहकारी संस्था, बारामती, पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ४,५००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४,५००/- रुपये (चार हजार पाचशे रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. १९/०७/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. १९/०७/२०२४ |

ठिकाण :- दिनांक १९/०७/२०२४ रोजी सहायक निबंधक सहकारी संस्था, बारामती यांचे कार्यालय, दुसरा मजला, प्रशासकीय भवन, ता. बारामती, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे जमीनीसंदर्भात विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, पुणे यांचे कोर्टामध्ये दावा दाखल केला असून, त्यामध्ये त्यांनी स्टे ऑर्डर दिली आहे. सदर स्टे ऑर्डरची कॉपी जमा करण्यासाठी तक्रारदार हे सहायक निबंधक सहकारी संस्था, बारामती यांचे कार्यालय, जि. पुणे येथे गेले असता, तेथील लोकसेवक श्री. अनिल महारनवर यांना भेटले असता, त्यांनी सदर काम करणेसाठी व मदत करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक अनिल महारनवर यांनी तक्रारदार यांचेकडे वरील नमुद कामासाठी पंचासमक्ष तडजोडीअंती ४,५००/- रुपयांची लाच मागणी करुन, लोकसेवक अनिल महारनवर यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ४,५००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.